# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - ०१

Website : www.mscepune.in    Email: mscescholarship@gmail.com    दूरध्वनी क्र. ०२०-२६१२३०६६/६७

**महत्त्वाचे/कालमर्यादित**

जा.क्र. मरापप/शिष्यवृत्ती/२०१८/ 304
दिनांक :- 11-1-2018

प्रति,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सर्व.
२. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, (उत्तर/दक्षिण/पश्चिम).
२. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व.
३. प्रशासन अधिकारी, म.न.पा., सर्व.

**विषय:- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) फेब्रुवारी २०१८ करीता PENDING शाळांचे शाळा संलग्नता व विद्यार्थी परीक्षा शुल्क भरणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दिनांक १८ फेब्रुवारी २०१८ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच वेळेस होणार आहे. सदर परीक्षेकरीता सर्व शाळांना अतिविलंब शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत कालावधी देण्यात आला होता. त्यानुसार शाळांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरलेली आहेत परंतु काही शाळांनी शाळा संलग्नता शुल्क व विद्यार्थी परीक्षा शुल्क भरलेले नाही.

आपणाकडून शाळांना सदर शुल्क RTGS / NEFT किंवा Internet Banking व्दारे परीक्षा परिषदेच्या खात्यावर भरण्याबाबत सूचना दिल्या जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यानुसार सदर शाळा परस्पर शुल्क परिषदेच्या खात्यावर जमा करीत आहे, परंतु त्याबाबतची कोणतीही माहिती परीक्षा परिषदेस प्राप्त न झाल्यामुळे सदर विद्यार्थी तांत्रिकदृष्टया Pending मध्ये दिसतात. त्यामुळे सदर विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

तरी सदर शाळांना शाळा संलग्नता शुल्क अथवा परीक्षा शुल्क RTGS / NEFT किंवा INTERNET BANKING व्दारे न भरता समक्ष परीक्षा परिषदेत उपस्थित राहुन शुल्क भरणेबाबत आपण आदेशीत करावे. उपरोक्तप्रमाणे शाळांनी परीक्षा परिषदेस माहिती न देता परस्पर शुल्क परिषदेच्या खात्यावर जमा केल्यामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास त्यास परीक्षा परिषद जबाबदार असणार नाही याची नोंद घ्यावी.

(सुखदेव डेरे)
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१**